| CNR No.MHPU130002192024 | नियमीत दिवाणी दावा क्र.३९/२०२४ |
|---|---|
| | बाळकृष्ण शिवराम राऊत<br>वि.<br>नानासोा हरिभाऊ तांदळे |

## निशाणी क्र.५ खालील आदेश

( दि. ११.०२.२०२६ )

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ११ विरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. तथापि, वादीने दि.११.११.२०२५ रोजी पुरशिस दाखल करुन सदर अर्जातील मागणी प्रतिवादी क्र.५ विरुद्ध सोडून देत असलेचे कथन केले आहे. त्यामुळे सदर अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ ते ११ यांचेविरुद्ध चालविणेत आला.

**वादीचे कथन संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे आहेः–**

२. गट नं.५५४ क्षेत्र ७ हे. २ आर + पोटखराब २ हे. ४८ आर दावा कलम १ मध्ये नमूद केलेल्या चतुःसिमेसह. (या मिळकतीस यापुढे संक्षिप्तरित्या 'दावा मिळकत' असे संबोधले आहे.)

३. दावा मिळकत ही मांडके कुटूंबियांची एकत्र कुटूंबाची असून त्यामध्ये वादीचे वडील शिवराम राऊत हे कुळ होते. दावा मिळकतीबाबत कुळ कायद्यानुसार चौकशीचे कामकाज झालेले नाही. कै. शिवराम राऊत यांचे पश्चात वादी व इतर कुटूंबिय यांचे नावाची नोंद दावा मिळकतीच्या सातबारासदरी फेरफार नं.१ नुसार झाली असून त्याप्रमाणे वादी व इतर कुटूंबियांचा कब्जा आहे. दावा मिळकतीचे सातबारासदरी तुकाराम हरी राऊत, धुमाजी दत्तात्रय राऊत व निवृत्ती सदू राऊत यांचे नावाची नोंद असली तरी वादीशिवाय इतर कोणाचाही ताबा नव्हता व नाही. प्रतिवादींचा दावा मिळकतीशी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नव्हता व नाही. परंतु, सातबारासदरी तुकाराम हरी राऊत यांचे नावाची नोंद असलेचा गैरफायदा घेवून तुकाराम यांचे दि.०२.०५.२००३ रोजीचे मृत्यूपश्चात वादीस अडथळा करणेचे उद्देशाने अभिलाषेपोटी तुकाराम यांचे कायदेशीर वारस व मिळकतीस कुळ असलेचे भासवून प्रतिवादींनी त्यांचे नावाची नोंद वादीचे अपरोक्ष दि.२७.०७.२०२३ रोजी फेरफार नं.११५६० प्रमाणे करुन घेतली. त्यानंतर दि.२९.११.२०२३ रोजी वादी

दावा मिळकतीत हजर असतांना प्रतिवादी क्र.१, २, ६ व ८ यांनी मिळकतीमध्ये येवून 'आमचा १/२ हिस्सा आहे, तो आमच्या ताब्यात द्या अन्यथा तुमचे खरे नाही' अशी धमकी दिली. वादीने त्यांना समजावून सांगितले असता प्रतिवादी क्र.१ ने 'मी दावा मिळकतीमध्ये ताबा घालून घर बांधणार आहे' अशी धमकी दिली. त्याबाबत प्रतिष्ठीत इसमांना प्रतिवादींना समजावून सांगणेची विनंती केली. त्यावर चिडून प्रतिवादींनी '१/२ क्षेत्राचा ताबा घेणार व घर बांधणार' अशी धमकी दिली. म्हणून प्रतिवादींनी चुकीच्या व पोकळीस्त नोंदीआधारे वादी व त्याचे कुटूंबियांचे दावा मिळकतीतील ताबे वहिवाटीस स्वतः अगर तर्फे इसमांनी हरकत अडथळा करु नये, जबरदस्तीने ताबा घेवू नये व कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अशी निरंतर ताकीद मिळणेकरीता प्रस्तुत दावा व दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरीता प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. वादीस प्रथमदर्शनी केस असून व नुकसानीचे तत्व वादीचे बाजूने आहे. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१, २, ६ ते ११ यांनी निशाणी क्र.१४ कडे त्यांचे लेखी उत्तर दाखल करुन वादीच्या कथनांना आव्हान दिले आहे. प्रतिवादींचे कथनानुसार गट नं.५५४ ही मिळकत मांडके कुटूंबियांची एकत्र कुटूंबाची मालकी वहिवाटीची होती. सदर मिळकत व मूळ सर्व्हे नं.१४१, १४४/१, १४४/२ व २४८/१ या मिळकतीस प्रतिवादींचे आजोबा हरी गोपाळ राऊत हे कूळ होते व तशी नोंद फेरफार नं.५३३६ प्रमाणे झालेली आहे. दावा मिळकत हरिबा गोपाळ राऊत हे सन १९३० चे पुर्वीपासून कुळ हक्काने वहिवाटून उत्पन्न घेत होते. त्यांचे पश्चात वारस म्हणून तुकाराम हरिबा राऊत व सरु सदू राऊत यांचे नावाची नोंद सातबारापत्रकी फेरफार नं.७५१७ अन्वये कुळ वहिवाटदार म्हणून झाली. कै. तुकाराम हरिबा राऊत यांनी त्यांचा दावा मिळकतीमध्ये ताबा असल्याने स्वखर्चाने शेती कामासाठी शेड्स बांधली, ज्याचा नंतर कुक्कुटपालनासाठी उपयोग केला. सदर कुक्कुटपालन व्यवसाय वारसा हक्काने प्रतिवादींचे ताब्यात आला. दावा मिळकतीचे सातबारापत्रकी वस्तीपड म्हणूनही नोंद आहे. वादीने त्याचे नावाची नोंद सातबारापत्रकी महसुल अधिकाऱ्यांना हाताशी धरुन बेकायदेशीरपणे इतर हक्कामध्ये सन १९८६-८७ नंतर करुन घेतली. परंतु, त्याचा फेरफार झाल्याचे दिसून येत नाही. वादीचे नांव इतर अधिकारात

पोकळीस्त स्वरुपात दाखल आहे. वादी अगर त्याचे कुटूंबाचा दावा मिळकतीशी कसलाही हक्क हितसंबंध नव्हता व नाही. तुकाराम हरिबा राऊत हे दि.०२.०५.२००३ रोजी मयत झाले असून प्रतिवादींची कायदेशीर वारस म्हणून फेरफार नं.११५६० अन्वये नोंद झाली आहे. तसेच, सरुबाई सदू राऊत या दि.०९.०९.१९७१ रोजी मयत झाल्या असून तिचे वारस म्हणून धर्माजी सदू राऊत, दत्तात्रय सदू राऊत व निवृत्ती सदू राऊत यांचे नावची नोंद फेरफार नं.१९९१ नुसार झाली आहे. प्रतिवादीं हे कुळहक्काने कायदेशीर वहिवाटदार व कुळ आहेत. वादीने विनाफेरफार बेकायदेशीरपणे सातबारापत्रकी नोंद लावून घेतली आहे. ज्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादींचे ताबेवहिवाटीस अडथळा निर्माण करणेच्या दृष्ट हेतूने अनाधिकाराने बेकायदेशीरपणे दादागिरीच्या जोरावर दावा मिळकतीमध्ये घुसण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीने बेकायदेशीरपणे मिळकतीमध्ये प्रवेश करता यावा या दृष्ट हेतूने बोगस व बनावट मजकुराचा, खरी वस्तुस्थिती व कागदपत्रे लपवून ठेवून प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**५.** प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकरीता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास येतात. त्या मुद्यांचे पुढील कारणास्तव मी माझे निष्कर्ष देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्याचे हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे शाबीत करतो काय ? | **नकारार्थी**. |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने असल्याचे वादी शाबीत करतो काय ? | **नकारार्थी**. |
| ३. | तुर्तातूर्त मनाई न दिल्यास आपले अपरिमित हानी होणार असल्याचे वादी शाबीत करतो काय ? | **नकारार्थी**. |
| ४. | मागणीनुसार तुर्तातूर्त मनाई मिळण्यास वादी पात्र आहे काय ? | **नकारार्थी**. |
| ५. | हुकूम काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

६. वादी व प्रतिवादीं तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादीं तर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचा उल्लेख याउपरांत समर्पक जागी केलेला आहे.

**मुद्दा क्र.१ ते ४ करीताः-**

७. वादीने तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी तीन मुद्दे म्हणजेच सकृतदर्शनी केस, सोयीचा समतोल व अपरिमित नुकसान या बाबीं प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वादीने कोणतीही बाब लपवून न ठेवता न्यायालयासमोर स्पष्ट हकीकत मांडणे जरुरीचे आहे. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाईसाठी दाखल केलेला असून तुर्तातूर्त मनाई अर्जाद्वारे प्रतिवादींनी चुकीच्या व पोकळीस्त नोंदीआधारे वादी व त्याचे कुटूंबियांचे दावा मिळकतीतील ताबे वहिवाटीस स्वतः अगर तर्फे इसमांनी हरकत अडथळा करु नये, जबरदस्तीने ताबा घेवू नये व कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अशी तुर्तातूर्त मनाई मागितली आहे. वादी व प्रतिवादींमध्ये दावा मिळकत ही मूळची मांडके कुटूंबियांची एकत्र कुटूंबाची असलेबाबत दूमत नाही.

८. वादीच्या कथनानूसार त्याचे वडील शिवराम राऊत हे दावा मिळकतीमध्ये कुळ होते व त्यांच्या मृत्यूनंतर वादी व इतर कुटूंबिय यांचे नावाची नोंद दावा मिळकतीच्या सातबारापत्रकी फेरफार नं.१ नुसार झाली आहे. त्यानुसार त्यांची दावा मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट आहे. वादीचे कथनानुसार वादी व त्याचे कुटूंबिय यांची दावा गट नं.५५४ क्षेत्र ७ हे. २ आर + पोटखराब २ हे. ४८ आर एकूण ९ हे. ५० आर मिळकतीमध्ये ताबे वहिवाट आहे. याउलट, प्रतिवादींचे असे कथन आहे की, त्यांचे आजोबा हरिबा गोपाळ राऊत हे दावा मिळकतीमध्ये सन १९३० चे पूर्वीपासून कुळ होते, तशी नोंद फेरफार नं.५३३६ प्रमाणे महसुल दप्तरी असून सन १९८६-८७ नंतर वादीने महसुल अधिकाऱ्यांना हाताशी धरुन बेकायदेशीरपणे नावाची नोंद करुन घेतली आहे. वादी व त्याचे कुटूंबियाचा दावा मिळकतीमध्ये कुळहक्क, हितसंबंध, कब्जा व वहिवाट नव्हती व नाही. वादी व प्रतिवादींमध्ये दावा मिळकतीचे कुळहक्क व कब्जे वहिवाटीबाबत वाद असलेचे दिसून येते. तथापि, वादी

व प्रतिवादीं दावा मिळकतीमध्ये कुळ आहेत कि नाहीत हा विषय या न्यायालयाच्या अधिकार कक्षेत येत नाही. वादीचा दावा ताबे वहिवाटीचे अनुषंगाने असून ताबे वहिवाटीचा वाद हा या न्यायालयाचे अधिकार कक्षेत येतो. त्यामुळे, प्रथमदर्शनी वादी व त्याचे कुटूंबियांचा ताबा दावा मिळकतीवर आहे का हे पाहणे आवश्यक आहे.

९. वादीने त्याचे व त्याचे कुटूंबियांची कब्जे वहिवाट दर्शविण्याकरीता दि.१६.०७.२०२४ रोजी व निशाणी क्र.३ सोबत दस्तऐवज दाखल केले आहेत. दावा मिळकत गट नं.५५४ चे सातबारा उताऱ्याचे अवलोकन केले असता दावा मिळकतीचे भोगवटदारसदरी मांडके नामक व्यक्तिंची नावे असून कुळ खंड व इतर अधिकारात धुमाजी दत्तात्रय राऊत, निवृत्ती सदू राऊत यांची फेरफार नं.१९९१ नुसार, प्रतिवादींची तुकाराम हरी राऊत याचे नांव कमी करुन फेरफार नं.११५६० नुसार तर वादी व धनंजय शिवराम राऊत व लक्ष्मिबाई शिवराम राऊत यांची फेरफार नं.१ नुसार नोंद असलेचे दिसून येते. वादी–प्रतिवादीं मार्फत दाखल फेरफार नं.१ चे अवलोकन केले करता असे दिसून येते की, सदर फेरफार दि.२२.०७.१९७४ रोजी मौजे वाल्हे, ता. पुरंदर, जि. पुणे येथे शासन आदेशानुसार जमीन एकत्रिकरण योजना अंमलात आलेबाबतचा आहे. तो वादी अथवा त्याचे कुटूंबिय यांचे नावाची नोंद वहिवाटदार म्हणून झालेबाबत नाही. त्यामुळे वादीचे कथन की, त्याचे व त्याचे कुटूंबियांची नोंद त्याचे वडिलांचे मृत्यूनंतर फेरफार नं.१ नुसार झाली यामध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसून येत नाही. वादीने सदर फेरफारशिवाय इतर कोणताही दस्तऐवज त्यांचे नावाची नोंद दावा मिळकतीच्या सातबारापत्रकी कशी झाली हे दर्शविण्याकरीता दाखल केलेला नाही. तसेच, वादी–प्रतिवादींतर्फे दाखल फेरफार नं.५३३६ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सर्व्हे नं.१४१, १४४/१, १४४/२ व २४८/१ या जमिनीस हरी गोपाळा राऊत हे संरक्षित कुळ होते. तसेच, फेरफार नं.१९९१ चे अवलोकनावरुन असे दिसून येते की, सरुबाई सदू राऊत यांचा दि.०९.०९.१९७१ रोजी मृत्यू झाल्याने धर्माजी सदू राऊत, दत्तात्रय सदू राऊत व निवृत्ती सदू राऊत यांची नांवे दावा मिळकत गट नं.५५४ सदरी नोंद झाली आहेत. वादी–प्रतिवादींमध्ये दावा मिळकतीचा जूना सर्व्हे नं.१४१ होता याबाबत दूमत नाही. त्यामुळे, दावा मिळकत गट नं.५५४ (जुना सर्व्हे नं.१४१) यास हरी गोपाळ राऊत हे कुळ असलेचे दिसून येते.

**१०.** वादीतर्फे दावा मिळकत गट नं.५५४ चा सन १९८६–८७ ते १९९८–९९ या कालावधीचा आणि सन २००६–०७ व २००७–०८ या कालावधीचे हस्तलिखीत उतारे दि.१६.०७.२०२४ रोजीचे यादीसोबत दाखल केले आहेत. सदर उताऱ्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा गट नं. ५५४ चे उताऱ्यावरती जमीन करणाऱ्याचे नांव या रकान्यात सन १९८६–८७ साली शिवराम हरी, तुकाराम हरी, सरु सदू राऊत यांचे नांव सन १९९२–९३ पर्यंत व सन १९९३–९४ मध्ये तुकाराम हरी, धर्माजी दत्तात्रय, निवृत्ती सदू राऊत यांची नांवे सन १९९८–९९ या कालावधीपर्यंत वहिवाटदार म्हणून नमुद आहेत. त्यामुळे हे स्पष्ट होते की, दावा मिळकतीचे वहिवाटदार सदरी सन १९८६–८७ ते १९९२–९३ या कालावधीत वादीचे वडील शिवराम हरी राऊत यांचे नावाची नोंद होती. तसेच, सन २००६–०७ मध्ये दावा मिळकत गट नं.५५४ सदरी जमीन करणाऱ्याचे नांव या रकान्यात वादी व त्याचा भाऊ धनंजय, तुकाराम हरी राऊत, धर्माजी दत्तात्रय व निवृत्ती सदू राऊत यांचे नावाची नोंद वहिवाटदार सदरी होती तर सन २००७–०८ मध्ये वादी व त्याचा भाऊ धनंजय यांची नोंद वहिवाटदार सदरी होती. वादीच्या नावे चिकू, तुती, वस्तीपड, रेशीमशेड व पोल्ट्रीपड सदरी अनुक्रमे ५५आर, १हे, ८आर, १आर व ५ आर अशी तर त्याचा भाऊ धनंजय याचे नावे चिकू ५५ आर, तुती १हे व रेशीम शेड १ आर इतक्या क्षेत्रावर वहिवाटदार म्हणून नोंद असलेचे दिसून येते.

**११.** तसेच, वादीने सदर यादीसोबत दि.२५.११.१९६८ व दि.२२.१२.१९६९ रोजीचे खरेदीखताची प्रत हजर केली आहे. सदर खरेदीखतांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीचे वडील शिवराम हरी राऊत यांनी विश्वनाथ गणेश मांडके व हेरंब मोरेश्वर मांडके यांचेकडून सर्व्हे नं.१४१ व इतर जमिनी मधील त्यांचा प्रत्येकी १/२४ हिस्सा अनुक्रमे र.रु.२५०/– व र.रु.३००/– यास खरेदी घेतला आहे. सदर खरेदीखतामध्ये असे नमुद आहे की, सदर जमीन खरेदी देवून ताबा कुळ म्हणून तुमचाच आहे, तोच ताबा आजरोजी या दस्तऐवजास कायम केला आहे. मूळ गट नं.५५४ सर्व्हे नं.१४१ मांडके कुटूंबियांची असलेबाबत वाद नाही. सदर खरेदीपत्रांची नोंद अनुक्रमे फेरफार नं.९९९८ व १०१६२ नुसार झाल्याचे सदर फेरफारचे अवलोकनावरुन दिसून येते. तथापि, याठिकाणी हे नमुद

करणे उचित आहे की, शिवराम हरी राऊत यांचा दावा मिळकत गट नं.५५४ (जूना सर्व्हे नं.१४१) मध्ये सन १९६८–६९ मध्ये ताबा होता हे दिसून येते.

**१२.** तसेच, वादीने सदर यादीसोबत तुकाराम हरी राऊत यांनी गांवकामगार तलाठी यांना दि.२२.०१.२००१ रोजी दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केली आहे. सदर अर्जाचे अवलोकन करता तो तुकाराम हरी राऊत यांनी दिला असून त्यामध्ये असे नमुद केले आहे की, शिवराम हरी राऊत हा त्यांचा भाऊ आहे. त्यामुळे तुकाराम हरी राऊत व शिवराम हरी राऊत ही हरी गोपाळा राऊत यांची मुले असलेचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. सदर अर्जामध्ये पुढे असे नमुद केले आहे की, गट नं. ५५४ (जूना सर्व्हे नं.१४१) या मिळकतीमध्ये त्यांचे वडील व ते दोघे भाऊ मिळून सन १९९५ च्या अगोदरपासून सदर शेती एकत्रित वहिवाटीत होते, वडिलांच्या निधनानंतर स्वतः तुकाराम व त्याचा भाऊ शिवराम हे आणि शिवराम हरी राऊत याचे निधनांतर त्याची मुले वादी, धनंजय व पत्नी लक्ष्मीबाई यांची एकत्रित वहिवाट आहे. तसेच, अर्जातील कथनानुसार असे दिसून येते की, गट नं.५५४ एकूण क्षेत्र १७ एकर २२ गुंठे पैकी २ एकर क्षेत्र धर्मा सदू राऊत व त्यांचे भाऊ यांचे वहिवाटीस असून उर्वरित १५ एकर २२ गुंठे क्षेत्रापैकी तुकाराम हरी राऊत ८ आणे हिश्श्याप्रमाणे व शिवराम हरी राऊत ८ आणे हिश्शाप्रमाणे वहिवाटीत होते. परंतु, शिवराम हरी राऊत याचे नांव कुळहक्काने लागले नव्हते तरी १५ एकर २२ गुंठे क्षेत्रापैकी ८ आणे हिश्श्यावर नाव लावणेस त्यांची कोणतीही हरकत नाही. सदर अर्जाचे अवलोकनावरुन हे स्पष्ट होते की, शिवराम हरी राऊत म्हणजे वादीचे वडील हे प्रतिवादींचे आजोबा तुकाराम हरी राऊत याचे भाऊ होते व तुकाराम व शिवराम यांची गट नं.५५४ पैकी १५ एकर २२ गुंठे क्षेत्रावर निम्म्या हिश्श्याने वहिवाट होती. मिळकतीवर तुकाराम हरी राऊत याचे नावाची नोंद झाली, परंतु शिवराम हरी राऊत याचे नावाची नोंद झाली नाही. वादीने त्याची व त्याचे कुटूंबियाची वहिवाट दाखविण्याकरीता सदर अर्जावर भिस्त ठेवली आहे. सदर अर्जावरुन हे स्पष्ट होते की, वादीचे वडिलांची गट नं.५५४ मध्ये १५ एकर २२ गुंठे क्षेत्रापैकी साधारणतः ७ एकर ३१ गुंठे क्षेत्रावर वहिवाट होती व उर्वरित ७ एकर ३१ गुंठे क्षेत्रावर प्रतिवादींचे आजोबा व उर्वरित २ गुंठे क्षेत्रावर धर्मा सदू राऊत व त्याचे भावाची वहिवाट होती. सदर अर्ज हा सन २००१ सालचा आहे. त्यावेळीही दावा जमीन गट नं.५५४ चे पूर्ण

क्षेत्रावर वादीचे वडिलांची वहिवाट नव्हती. सदर अर्ज व सातबारावरील नोंदीवरुन हे स्पष्ट होते की, प्रतिवादींचे आजोबा यांचीही गट नं.५५४ वर वहिवाट होती. प्रतिवादीचे आजोबा तुकाराम हरी राऊत व सरु सदू राऊत यांची नोंद हरी गोपाळ राऊत, जे सर्व्हे नं.१४१ (नविन गट नं.५५४) मध्ये वहिवाटदार होते, यांच्या मृत्यूनंतर झाली होती. परंतु, वादीच्या वडिलांची झाली नव्हती. त्यामुळे वादीचे कथन की, दावा मिळकतीवर वादी व त्याचे कुटूंबाची कब्जे वहिवाट होती इतर कोणाचीही नव्हती यामध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसून येत नाही. तसेच, प्रतिवादींच्या नांवाची नोंद चुकीची व पोकळीस्त आहे यामध्येही प्रथमदर्शनी तथ्य दिसून येत नाही. तुकाराम हरी राऊत यांचा मृत्यू दि.०२.०५.२००३ रोजी झाल्याचे वादातीत नाही. तसेच, प्रतिवादींचे नावाची नोंद फेरफार नं.११५६० नुसार झाल्याचे फेरफार उताऱ्यावरुन स्पष्ट होते. परंतु, सदर फेरफार वादीने आव्हानित केल्याबाबत कोणताही दस्तऐवज दिसून येत नाही.

**१३.** वादीतर्फे दि.१६.०७.२०२४ रोजीचे यादीसोबत दाखल पुढील दस्तऐवजावरुन असे दिसून येते की, वादीने त्याची दावा गट नं.५५४ मध्ये ऊस पिक असलेबाबत सन २०१४–१५ ते २०२४–२५ या कालावधीमध्ये सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि. सोमेश्वरनगर यांचेकडे नोंद केली आहे. तसेच, महाराष्ट्र शासन कृषी विभागाकडून सन २०१४–१५ या आर्थिक वर्षात ठिबक सिचंनाकरीता व सन २०१९–२० या आर्थिक वर्षात फळबाग लागवडीकरीता अनुक्रमे र.रु.४५,२६१/– व र.रु.१३,१५२/– इतके अनुदान घेतले आहे. तसेच, त्याने बँक ऑफ महाराष्ट्र कडून दावा मिळकत गट नं.५५४ वर कर्ज घेतले होते, त्याची नोंद देखील फेरफार नं.५०५२, ४६५६, ४४५२ प्रमाणे झालेचे दिसून येते. तसेच, दि.११.०१.२०१६ रोजीचे बँक ऑफ महाराष्ट्र चे पत्रावरुन असे दिसून येते की, दावा मिळकत गट नं.५५४ वरील कर्जाचा बोजा कमी करणेबाबत कळविले आहे. त्याचबरोबर पुढे दाखल दस्तऐवज म्हणजे विज आकार देयक हे वादीचे नावे गट नं. ५५४ मध्ये असलेचे दिसून येते. सदरचे ऊस नोंदणी, कर्जाचे फेरफार, बँकेचे पत्र व विज देयकावरुन वादी व त्याचा भाऊ यांनी वेळोवेळी दावा मिळकत गट नं.५५४ वर कर्ज घेतले होते, कृषी खात्याकडून फळबाग व ठिबक सिंचन अनुदान घेतले असून विद्यूत जोडणी देखील करुन घेतली असल्याचे दिसते. वादी व त्याचा भाऊ यांचा गट

नं. ५५४ मध्ये ताबा असलेचे वरील दस्तऐवज, तुकाराम हरी राऊत यांनी दिले अर्जावरुन व सातबारावरील वहिवाट नोंदीवरुन दिसून येत असलेतरी पूर्ण गट नं. ५५४ वर वहिवाट दिसून येत नाही.

**१४.** वादीने पुढे सदर यादीसोबत दाखल दस्तऐवजावरुन असे दिसून येते की, वादीने दि.१७.०९.२००७ रोजी दावा मिळकत गट नं.५५४ पैकी त्याचे हिश्श्याचे क्षेत्रापैकी ५ आर क्षेत्राचे संमती पत्र सागर भुजबळ याला लिहून दिले असून सदर सागर भुजबळ याचे नांवे विद्युत जोडणी झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ ने सदर पोल्ट्री शेडबाबत संबंधित प्रिमीयम चिक्स ॲड फिड्स प्रा. लि., पोलीस स्टेशन व किरण ॲग्रो यांचेकडे तक्रारी अर्ज दिल्याचे दिसून येते. पोल्ट्री शेडची नोंद ही सन २००६–०७ या वर्षाकरीता ५ आर क्षेत्रावर असलेचे दिसून येते. तुकाराम राऊत यांनी शेतीकामासाठी शेड उभा केले होते, त्याचा वापर प्रतिवादींनी पुढे पोल्ट्री फार्म साठी केला असे कथन केले असलेतरी दावा मिळकतीचे सातबारासदरी पोल्ट्री शेडची नोंद प्रतिवादींचे नांवे असलेचे दिसून येत नाही. त्यामुळे पोल्ट्री शेड प्रतिवादींचे असलेचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत नाही.

**१५.** वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, दावा मिळकत गट नं.५५४ चा जुना सर्व्हे नं.१४१ हा होता, ज्यामध्ये हरी गोपाळा राऊत हे कुळ वहिवाटदार होते. त्याबाबतची नोंद फेरफार नं.५३३६ नुसार झाली होती. त्यांच्या मृत्यूनंतर तुकाराम हरी राऊत व सरु सदू राऊत यांची नोंद इतर हक्कात वहिवाटदार म्हणून झाली. शिवराम हरी राऊत हा तुकाराम हरी राऊत यांचा भाऊ होता, परंतु त्याची नोंद वहिवाटदार म्हणून झाली नाही. तथापि, शिवराम हरी राऊत व तुकाराम हरी राऊत यांची गट नं.५५४ पैकी १५ एकर २२ आर क्षेत्रामध्ये निम्या–निम्या हिश्श्याने व धर्माजी राऊत वगैरे यांची २ एकर क्षेत्रावर वहिवाट होती. दि.२५.११.१९६८ व दि.२२.१२.१९६९ रोजीचे खरेदी दस्तावरुन हे स्पष्ट होते की, शिवराम हरी राऊत याची सर्व्हे नं.१४१ मध्ये वहिवाट होती, ज्यामध्ये त्याने विश्वनाथ गणेश मांडके व हेरंब मोरेश्वर मांडके यांचा प्रत्येकी १/२४ हिस्सा विकत घेतला व कुळाने असणारा कब्जा कायम केला. वादीतर्फे सन १९८६–८७ ते १९९८–९९, २००६–०७ ते २००७–०८ चे सातबारा उताऱ्यावरील नोंदीवरुन वादी व तुकाराम हरी राऊत यांची वहिवाट असलेचे दिसून येते. तुकाराम हरी राऊत मयत झाल्यामुळे प्रतिवादींचे

नावाची नोंद सातबारासदरी फेरफार नं.११५६० प्रमाणे दि.०५.०७.२०२३ रोजी झाली आहे. वादी दावा मिळकतीचे संपूर्ण क्षेत्रावर ताबा वहिवाट असलेचे कथन करीत असलातरी पूर्ण क्षेत्रावर ताबा वहिवाट असलेचे दाखल दस्तऐवजावरुन दिसून येत नाही. तुकाराम हरी राऊत हे दि.०२.०५.२००३ रोजी मयत असलेचे वादातीत नसले तरी वादीकडे पूर्ण क्षेत्राचा ताबा आला अथवा घेतला याबाबत प्रथदर्शनी कोणताही दस्तऐवज अथवा कथन नाही. वादी त्यांचा पूर्ण क्षेत्रावर ताबा असलेबाबत शेजारील शेतकरी यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करु शकला असता. तथापि, तसे झालेले नाही. सन १९८६–८७ पूर्वीचा कोणताही दस्तऐवज अभिलेखावर दाखल नाही. प्रथमदर्शनी महसुल अभिलेखावरुन वादी व त्याचे कुटूंबाचा दावा मिळकतीचे पूर्ण क्षेत्रावर ताबा असलेचे स्पष्ट होत नाही. परिणामी, सकृतदर्शनी केस, नुकसानीचे तत्व व सोईचा समतोल ही वादीचे बाजूने नाही. त्यामुळे वादी तुर्तातूर्त मनाई मिळण्यास पात्र नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.५ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.
२. खर्चाबाबत आदेश नाही.

MOTE TUKARAM PATANG
Digitally signed by MOTE TUKARAM PATANG
Date: 2026.02.13 17:53:59 +0530

**( तुकाराम प. मोटे )**
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
सासवड, जि. पुणे.

दिनांकः– ११/०२/२०२६.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर कथन करतो की, या आदेशाच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुरांशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :: | संतोष किशनराव पांचाळ, लघुलेखक (श्रेणी–III) |
| **न्यायालयाचे नाव** | :: | **श्री. तुकाराम प. मोटे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व<br>न्यायदंडाधिकारी वर्ग–१, सासवड, जि. पुणे. |
| आदेशाची तारीख | :: | ११/०२/२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी आदेशावर सही केल्याची तारीख | :: | १३/०२/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :: | १६/०२/२०२६ |